# 'रविकिरण'च्या बालनाट्य स्पर्धेत कल्याण-डोंबिवलीची बाजी

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

'रविकिरण' या कामगार विभागात गेली ५८ वर्षे काम करणाऱ्या संस्थेकडून आयोजित बालनाट्य स्पर्धा नुकतीच परळच्या दामोदर हॉलमध्ये पार पडली. यात डोंबिवलीच्या रवींद्र शिक्षण मंडळाच्या 'नभी उतरे इंद्रधनू' या नाटकाने बाजी मारली. बालनाट्य स्पर्धेचे बत्तीसावे वर्ष असलेल्या रविकिरणच्या या स्पर्धेत सगळ्यात जास्त बक्षिसे कल्याण-डोंबिवलीच्या संस्थांनी मिळवली.

यावर्षी ही स्पर्धा ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांच्या स्मरणार्थ आयोजित केली होती. लीला हडप, शिरीष राणे आणि श्रीनिवास नार्वेकर यांनी स्पर्धेच्या परीक्षणाचे काम बघितले. तर पारितोषिक वितरण सोहळ्याला लेखक-अभिनेता प्रल्हाद कुडतरकर आणि सुलभा देशपांडे यांचे सुपुत्र निनाद देशपांडे यांची उपस्थिती होती. सर्वोत्कृष्ट नाटकांसह लेखन, दिग्दर्शन, प्रकाशयोजना, नेपथ्य अशी तांत्रिक बक्षिसेही डोंबिवलीच्या संस्थांनी पटकावली. त्यामुळे एकेकाळी मुंबईच्या शाळांचा वरचष्मा असलेल्या बालनाट्य स्पर्धेला आता कल्याण-डोंबिवलीमधूनही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसते.



यापूर्वी मुंबईत असणारा सांस्कृतिक वारसा आता डोंबिवली-कल्याणकडेही गेला आहे असे म्हणायला हरकत नाही. पूर्वी दादर-परळमधल्या अनेक नामांकित शाळा स्पर्धेत सहभागी व्हायच्या. आता मात्र या शाळांमधून एंट्री येणे बंद झाले आहे. काही नाटके तर शाळेतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनीच बसवली होती. बालनाट्य स्पर्धेचा हा वारसा आता कल्याण-डोंबिवलीतून जोपासला जाईल अशी आशा आहे.

- विजय टाकळे, सभासद, रविकिरण मंडळ

## उत्कृष्ट बालनाट्य

**प्रथम** - नभी उमटे इंद्रधनू (रवींद्र शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली)

**द्वितीय** - कस्तुरी (महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन),

**तृतीय** - अ ते ज्ञ (सेक्रेट हार्ट स्कुल, कल्याण)